## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक : ३०/०३/२०२६ )

आरोपी विरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अंतर्गत दंडनिय अपराधा करीता आरोप ठेवण्यात आले. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द आरोप सिध्द होण्याकरीता एकूण ३ साक्षीदारांचा तोंडी पुरावा नोंदविला.

२. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहीत्यावरून माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे :—

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १७/०८/२०२४ रोजी १८:०० ते १८:४५ वाजताच्या दरम्यान मौजा लाखेगांव ता. तिरोडा येथे आरोपीच्या ताब्यातुन १० लिटर मोहाफुलाची हातभट्टी दारू असे एकूण किमंत रूपये १०००/— विना परवाना अवैधरित्या मिळुन आले ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**३.** अभियोग पक्षातर्फे साक्ष नोंदवील्यानंतर आरोपीविरूध्द पुरावा आल्याने त्याचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले. तसेच सरकारीपक्षाने जप्ती पंचनामा **नि.क्र. १२** वर भिस्त ठेवलेली आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीता :**

**४.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी यांनी साक्ष दिली की त्यानी दिनांक १७/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष आरोपीकडून मोहाफुलाची हातभट्टी दारू जप्त केली होती व सॅपल काढले. त्यानंतर पंचनामा नि.क्र. १२ वर तयार केला. आरोपीविरूध्द फिर्याद व एफआयआर नि.क्र. १३ व १४ वर नोंदविली. सा.क्र. ४ विजय तिरपुडे तपासी अधिकरी असुन त्यांनी आरोपीकडून जप्त दारू वेगळी करून सि.ए फॉर्म व मुद्देमाल पावती नि.क्र. १६ व १७ अन्वये बनविला.

तपासअंती त्यांनी दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले. परंतु आरोपीवरील गुन्हा सिद्ध होणेकामी त्याच्याकडून झालेली जप्ती सिद्ध होणे आवश्यक आहे. त्याकरीता अभियोगपक्षाने पंच हिवराव बाळा जगणीक (सा.क्र.१) व अरूण जयहिंद चौहाण (सा.क्र.२) यांना तपासले. परंतु त्यांनी अभियोग पक्षास मदत केली नाही. जप्ती पंचनाम्यावरील सही ओळखली परंतु त्यांच्या समक्ष दारू जप्त झाल्याचे व पंचनामा तयार केल्याचे त्यांनी अमान्य केले. सदरहू प्रकरणात आरोपी कडून झालेली जप्ती स्वतंत्र पंच साक्षीदाराकडून सिध्द होणे महत्वाचे होते. परंतु प्रस्तुत प्रकरणात सदरहू जप्ती सिध्द झालेली नाही. तसेच सि.ए. रिपोर्ट अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे असे निष्कसीत होते की, आरोपीविरुध्द लावण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला. सबब, मी **मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी** देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या गुन्हयातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त शिल्लक मोहादारू राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांच्याकडे अपीलाचा कालावधीनंतर विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रूपये ७,५००/— (रूपये सात हजार फक्त) चे जामीन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by APEKSHA TULARAM BANSOD
Date: 2026.03.31 16:20:32 +0530

**दिनांक : ३०.०३.२०२६** **( अ.तु.बन्सोड)**
**ठिकाण : तिरोडा** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिरोडा.**